जिल्हा व सत्र न्यायालय, नंदुरबार

पत्ता – जिल्हाधिकारी कार्यालयाच्या समोर, टोकरतलाव रोड, नंदुरबार
फोन नं. ०२५६४– २१० १५१
ई–मेल – mahdhunansc@aij.gov.in

कामाचे स्वरुप :– **जिल्हा न्यायालय, नंदुरबार व अधिपत्याखालील तालुका न्यायालयांकरिता सफाईगार या पदांच्या बाहय यंत्रणेद्वारे साधनसामग्रीसहीत मानवी पध्दतीने दैनंदिन सेवा उपलब्ध करुन घेण्यासाठी नोंदणीकृत कंत्राटदाराकडून विहीत नमुन्यात ऑनलाईन ई–निविदा मागविण्यात येत आहेत.**

ई–निविदा वेळापत्रक

अ. क्र.	तपशिल	दिनांक	वेळ
१	ई निविदा प्रसिध्दी	१६/०२/२०२६	सकाळी १०.०० वाजता
२	ई निविदा विक्री व सादर करणेस सुरुवात दिनांक	१६/०२/२०२६	सकाळी १०.०० वाजता
३	निविदा पूर्व बैठक	२०/०२/२०२६	सकाळी १०.३० वाजता
४	ई निविदा सादर करणेचा अंतिम दिनांक	०२/०३/२०२६	सायं. ५.०० वाजेपावे
५	तांत्रिक निविदा उघडण्याचा दिनांक	०४/०३/२०२६	सायं. ५.४५ वाजता
६	आर्थिक निविदा उघडण्याचा दिनांक	तांत्रिक लिफाफ्यात पात्र झालेल्या निविदाधारकांना व्यापारी / आर्थिक लिफाफा उघडणेचा दिनांक व वेळ कळविण्यात येईल.	

BLANK
PAGE

जिल्हा व सत्र न्यायालय, नंदुरबार

पत्ता – जिल्हाधिकारी कार्यालयाच्या समोर, टोकरतलाव रोड, नंदुरबार
फोन नं. ०२५६४– २१० १५१
ई–मेल – mahdhunansc@aij.gov.in

कामाचे स्वरुप :– **जिल्हा न्यायालय, नंदुरबार व अधिपत्याखालील तालुका न्यायालयांकरिता सफाईगार या पदांच्या बाहय यंत्रणेद्वारे साधनसामग्रीसहीत मानवी पध्दतीने दैनंदिन सेवा उपलब्ध करुन घेण्यासाठी नोंदणीकृत कंत्राटदाराकडून विहीत नमुन्यात ऑनलाईन ई–निविदा मागविण्यात येत आहेत.**

अनुक्रमणिका

अ. क्र.	तपशिल	पृष्ठ क्रमांक	
१	ई–निविदा सुचना	१	१
२	विभाग–१ सर्वसाधारण सुचना	२	२
३	विभाग–२ न्यायालयीन इमारतीचे व आवाराचे क्षेत्रफळ	३	३
४	विभाग–३ कामासंबंधीत निविदेच्या अटी व शर्ती	४	९
५	विभाग–४ (अ) निविदेच्या सर्वसाधारण अटी व शर्ती	१०	१०
६	विभाग–४ (ब) निविदा लिफाफामध्ये सादर करावयाची कागदपत्रे	११	१२
७	विभाग–५ निविदा वेळापत्रक	१३	१३
८	विभाग–५ (अ) आर्थिक निविदा	१४	१५
९	विभाग– ६ निविदापूर्व शंका विचारण्यासाठीचा नमुना	१६	१६
१०	हमीपत्र	१७	१७

BLANK
PAGE

जिल्हा व सत्र न्यायालय, नंदुरबार

पत्ता – जिल्हाधिकारी कार्यालयाच्या समोर, टोकरतलाव रोड, नंदुरबार
फोन नं. ०२५६४– २१० १५१
ई–मेल – mahdhunansc@aij.gov.in

ई–निविदा सुचना

संदर्भ :– वित्त/ कंत्राटी ई–निविदा/ ०१/२०२५–२६

बाह्य यंत्रणेद्वारे कंत्राटदारा मार्फत सफाईगार पदांची सेवा उपलब्ध करुन घेण्याबाबत जाहीर ई–निवीदा

जिल्हा न्यायालय, नंदुरबार व अधिपत्याखालील तालुका न्यायालयांकरिता सफाईगार या पदांच्या बाहय यंत्रणेद्वारे साधनसामग्रीसहीत मानवी पध्दतीने दैनंदिन सेवा उपलब्ध करुन घेण्यासाठी नोंदणीकृत कंत्राटदाराकडून विहीत नमुन्यात ऑनलाईन ई–निविदा मागविण्यात येत आहेत. विस्तृत निविदा सूचनांसह त्यासंबंधीच्या अटी व शर्तीसह दिनांक १६/०२/२०२६ रोजी सकाळी १०.०० वाजेपासून ते ०२/०३/ २०२६ सायंकाळी ५.०० वाजेपावेतो महाराष्ट्र शासनाचे https://mahatenders.gov.in आणि https://nandurbar.dcourts.gov.in संकेतस्थळांवर उपलब्ध आहेत.

तरी इच्छुकांनी निविदेमध्ये नमुद अटी व शर्तींचे व सुचनांचे अवलोकन करुन ऑनलाईन ई–निविदा सादर कराव्यात.

K.R.Pathak

दिनांक : १६/०२/२०२६

ठिकाण : नंदुरबार

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
नंदुरबार

District & Sessions Court Nandurbar

न्यायालयाचा शिक्का

जिल्हा व सत्र न्यायालय, नंदुरबार

पत्ता – जिल्हाधिकारी कार्यालयाच्या समोर, टोकरतलाव रोड, नंदुरबार

फोन नं. ०२५६४– २१० १५१

ई–मेल – mahdhunansc@aij.gov.in

ई–निविदा क्र. ३ वित्त / कंत्राटीसेवा/ ०१/२०२५–२६

जिल्हा व सत्र न्यायालय, नंदुरबार व त्यांचे अधिपत्याखालील तालुका न्यायालयांच्या आवारांची, स्वच्छतागृहांची साफसफाई, झाडलोट, तसेच इमारत व न्यायायलयाचा परिसर स्वच्छ ठेवणेसाठी सफाईगार या पदाची शासनमान्य कंत्राकदारांकडून साधन सामग्री सहित, न्यायालय आवाराचे क्षेत्रफळानुसार, मानवी पध्दतीने कंत्राटी सेवा उपलब्ध करण्यासाठी **दोन वर्ष** कालावधीकरिता शासनमान्य निविदाधारकांकडून ई–निविदा मागविण्यात येत आहे.

विभाग –१

१	निविदा स्वरुप	जिल्हा व सत्र न्यायालय, नंदुरबार व त्या अधिपत्या खालील तालुका न्यायालयांच्या आवाराची स्वच्छतागृहांची साफसफाई, झाडलोट, तसेच इमारत व न्यायालयाचा परिसर स्वच्छ ठेवणेसाठी सफाईगार या पदाची शासनमान्य कंत्राटदारांकडून साधन सामग्री सहित मानवी पध्दतीने कंत्राटी सेवा उपलब्ध करणे.
२	निविदा फार्म फी	रु.**१५,०००/-** (शासकीय नियमानुसार सुट असल्यास वगळून)
३	निविदा रक्कम अंदाजे	**रु. ५६,०८,४१८/– (एक वर्षाकरिता)**
४	बयाणा रक्कम	रु.**१,५०,०००/-** (शासकीय नियमानुसार सुट असल्यास वगळून)
५	सुरक्षाठेव रक्कम	निविदा रक्कमेच्या **३** टक्के
६	ई–निविदा प्रसिध्दी	दि. १६/०२/२०२६ स. १०.०० वा.
७	निविदा पूर्व बैठक दि.	दि. २०/०२/२०२६ स. १०–३० वा.
८	ई–निविदा स्वीकारणेचा अंतिम दिनांक	दि. ०२/०३/२०२६ सायं ५.०० वा. पावेतो
९	ई–निविदा उघडण्याचा दिनांक	**अ) तांत्रिक निविदा – लिफाफा क्र.१** जिल्हा व सत्र न्यायालय, नंदुरबार येथे दिनांक ०४/०३/२०२६ रोजी सायं.५.४५ वाजता उघडण्यात येतील. **ब) आर्थिक निविदा – लिफाफा क्र.२** तांत्रिक निविदेतील कागदपत्रांची पडताळणी झाल्यानंतर आर्थिक निविदा उघडणेबाबत निविदाधारकांना कळविण्यात येईल.

विभाग –२

जिल्हा व सत्र न्यायालय, नंदुरबार व त्यांचे अधिपत्याखालील तालुका न्यायालयांच्या आवारांची, स्वच्छतागृहांची साफसफाई, झाडलोट, तसेच इमारत व न्यायायलयाचा परिसर स्वच्छ ठेवणेसाठी सफाईगार या पदाची शासनमान्य कंत्राटदारांकडून साधन सामग्री सहित, न्यायालय आवाचे क्षेत्रफळानुसार, मानवी पध्दतीने कंत्राटी सेवा उपलब्ध करणे. यासाठी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नंदुरबार यांनी **दोन वर्ष** कालावधी करिता न्यायालयीन इमारतीचे व आवाराचे क्षेत्रफळ खालीलप्रमाणे :–

अ.क्र.	न्यायालयाचे नांव	न्यायालयीन इमारतीचे स्वच्छतागृहासह क्षेत्रफळ	न्यायालयीन बाहेरील परिसराचे क्षेत्रफळ
१	जिल्हा व सत्र न्यायालय, नंदुरबार	९६२४.८४ चौ. मि.	१२११०.८७ चौ. मि.
२	जिल्हा विधी व सेवा प्राधिकरण, नंदुरबार	३१८.०६ चौ. मि.	२१७५.०५ चौ. मि.
३	दिवाणी न्यायालय क.स्तर, नवापूर	४६.५८ चौ. मि.	३४६३.९२ चौ. मि.
४	दिवाणी न्यायालय क.स्तर, तळोदा	३६५.५४ चौ. मि.	४६९४.७१ चौ. मि.
५	अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय, शहादा	१६३६.४८ चौ. मि.	५४५१.१० चौ. मि.
६	दिवाणी न्यायालय क.स्तर, धडगांव	२४३.६६ चौ. मि.	८७६.३४ चौ. मि.
७	दिवाणी न्यायालय क.स्तर, अक्कलकुवा	२०२५.९० चौ. मि.	१७७६४.८४ चौ. मि.
	एकूण –	**१४२६१.०६ चौ.मि.**	**४६५३६.८३ चौ. मि.**

विभाग –३

अ – विभाग –२ मध्ये नमुद विवरणपत्रानुसार कंत्राटी साफसफाई कामा संबंधित निविदेच्या अटी व शर्ती :–

1. जिल्हा व सत्र न्यायालय, नंदुरबार येथील संपुर्ण मुख्य इमारत, तसेच जिल्हा विधि सेवा प्राधीकरण कार्यालयाची संपुर्ण इमारतीमधीअंतर्गत व बाहय परिसराची साफसफाई, तसेच जिल्हा व सत्र न्यायालय, नंदुरबार यांचे अधिपत्याखालील तालुका न्यायालयातील अंतर्गत व बाहय परिसराची साफसफाई करिता कंत्राटदार यांनी साफसफाईचे काम, खाली नमुद केल्याप्रमाणे करुन दयावयाचे आहेत.

अ. इमारतीच्या बाहेरील परिसर व रस्ते आणि तळमजल्यावरील मोकळा परिसर झाडून स्वच्छ करणे व ध्वजस्तंभ झाडून पुसुन घेणे.

ब. जिल्हा न्यायालय, नंदुरबार न्यायालयांचे व तालुका न्यायालयांचे सर्व इमारतीतील सर्व मजल्यांवरील सर्व प्रसाधनगृहे, वॉश बेसिन, उदवाहने, व्हरांडा, जिना, लोखंडी जाळी, खिडक्यांच्या काचा / तावदाने (आतुन–बाहेरुन), खिडक्यांची चौकट, दरवाजे, व्हरांडयातील फरशी झाडणे, घासून स्वच्छ करणे इ. तसेच आवारातील परिसर स्वच्छ करणे.

क. इमारतीच्या सभोवतालचा मोकळा परिसर स्वच्छ करणे.

अ.क्र.	कामाबाबतचा तपशिल	कामाची वारंवारिता	काम करण्याचे स्वरुप
१	फरशीच्या स्वच्छतेबाबत (सर्व इमारतीतील सर्व मजल्या वरील व्हरांडे/कॅरीडोअर, जिन्यामधील फरशी)	दररोज दिवसातुन एकदा	झाडणे, घासुन स्वच्छ करणे व कोरडया कपडयाने पुसुन घेणे तसेच विविध मशिनद्वारे साफसफाई करणे.
२	सर्व मजल्यावरील सर्व प्रसाधनगृहे, वॉश बेसिन, पिण्याच्या पाण्याचे नळ व त्या भोवतीची जागा	दररोज दिवसातुन दोन वेळा	धुणे व ॲसिड, फिनाईलचा वापर करुन घासून स्वच्छ करणे, एच.पी. जेट यंत्राद्वारे स्वच्छता करणे.
३	इमारतीच्या बाहेरील सर्व मोकळा परिसर व रस्ते	दररोज दिवसातुन एकदा	झाडून स्वच्छ ठेवणे
४	व्हरांडयामधील लोखंडी जाळी, खिडक्यांच्या काचा/तावदाने, खिडक्यांची चौकट, दरवाजे, पंखे, जिन्याची रेलींग, उदवाहने	आठवडयातुन एका ठराविक दिवशी एकदा	ओल्या कपडयाने स्वच्छ करुन कोरडया कपडयाने पुसुन घेणे व काचा ग्लास क्लीन किटचा वापर करुन स्वच्छ ठेवणे.

५	इमारतीचे स्तंभ व लगतच्या भिंतीच्या स्वच्छते बाबत	आठवडयातुन एका ठराविक दिवशी एकदा	झाडून, धुळ, जाळे काढून स्वच्छ करणे.
६	व्हराडयांतील पिण्याचे पाण्याचे वॉटर कुलर व त्या भोवतालची जागा	दररोज दिवसातून एकदा	वॉटर कुलर आतुन बाहेरुन धुवून पुसून स्वच्छ करणे व त्याभोवतीची जागा स्वच्छ करणे.
७	परिसरातील हिरवळीस व शोभेच्या झाडांना पाणी देणे	आठवडयातुन दोन ठराविक दिवशी एकदा (उन्हाळ्यात दोन दिवसांतुन एका दिवशी)	परिसरातील हिरवळीस व झाडांना पाणी देणे, हिरवळीची वाढ झाल्यानंतर ती कापून टाकणे व झाडांची निगा राखणे.
८	पाणी साठविण्याचे सर्व हौद, प्लॉस्टीकच्या टाक्या यांच्या स्वच्छते बाबत	दोन महिन्यातुन एकदा	आतुन धुवून व पुसुन स्वच्छ करणे
९	कच–याची विल्हेवाट	दररा ेज दिवसातुन एकदा	जमा झालेल्या कच–याची विल्हेवाट लावणे.

2. शासन निर्णय पदनि २५१२/प्र.क्र. १५७/कार्या–१२ दि,२७ जानेवारी, २०१५, दि.०२ ऑगस्ट, २०१६ आणि २३ फेब्रुवारी २०१७ तसेच व उद्या ेग उर्जा व कामगार विभाग, शासन निर्ण क्र. भाखरा–२०१४/प्र.क्र.८२ भाग १११ दिनांक ०१/१२/२०१६ चे नियम पुस्तीके मधील निर्देशानुसार आणि शासनाकडून वेळोवेळी आलेल्या सूचनांचे काटेकोर पालन करणे निविदाधारकास बंधनकारक आहे. (सदर शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.) निर्देशांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक आहे याची कृपया नोंद घ्यावी.
3. विभाग ५, प्रपत्र–१ मधील स्तंभ क्र.४ते७ मधील माहिती कंत्राटदारांनी भरावयाची आहे.
4. साफसफाईच्या कामासाठी नेमलेल्या कंत्राटी कामगार यांना किमान वेतन अधिनियम १९४८ मधील तरतुदीनुसार वेतन, महागाई भत्ता, इतर भत्ते व सवलती लागु करणे कंत्राटदारावर बंधनकारक असेल. तसेच कामगारांच्या द्यावयाची वेतनाची रक्कम व अतिकालीक भत्याची रक्कम ही किमान वेतन कायद्यातील तरतुदीपेक्षा कमी नसावी.
5. कंत्राटदाराने न्यायालयाचे कामकाजासाठी नेमलेल्या कंत्राटी कामगारांना किमान वेतन कायद्यातील तरतुदीपेक्षा कमी वेतन अदा केल्याचे निर्दशनास आले तर संबंधीत कंत्राटदारांवर किमान वेतन कायद्यातील तरतुदीप्रमाणे कारवाई करण्यात येईल व त्यांचे कंत्राट तात्काळ रद्द करुन त्याचे नाव काळया यादीत टाकण्याची कार्यवाही करण्यात येईल. त्या अनुषंगाने कंत्राटदर यांना सुचित करण्यात येते की, त्यांनी नेमणुक केलेल्या

कर्मचा–यांच्या वेतनाबाबतच्या किंवा सेवेबाबतच्या कोणत्याही तक्रारी या कार्यालयाकडे येणार नाहीत याची त्यांनी दखल घ्यावयाची आहे. काम करतांना कामगारांना कोणतीही ईजा किंवा नुकसान झाल्यास त्याची जबाबदारी संबंधीत कंत्राटदार यांची राहील.

6. कंत्राटदाराने / संस्थेने / कंपनीने त्यांचे नोंदणी प्रमाणपत्र, सेवा कराचे प्रमाणपत्रे, मागील तीन वर्षाचे आयकर प्रमाणपत्रे, पॅन कार्ड, ई एस.आय.सी. प्रमाणपत्र, पी. एफ. प्रमाणपत्र, प्रोफेशनल टॅक्स प्रमाणपत्रासह जी.एस.टी. नोंदणी प्रमाणपत्र इत्यांदीच्या स्वाक्षांकीत प्रती निविदेसोबत सादर करणे बंधनकारक आहे. सदर प्रमाणपत्रांच्या व अनुभवाच्या कागदपत्रकांच्या छायांकीत प्रती न जोडल्यास त्यांचे निवीदा अर्ज रद्द ठरविण्यात येतील.
7. सुरक्षेच्या कारणास्तव कंत्राटदाराने त्यांचे मार्फत कामावर नियुक्त केलेल्या प्रत्येक कामगाराचे नाव, पत्ते इत्यादी कार्यालयास सादर करणे कंत्राटदारावर बंधनकारक असेल.
8. सदर कामाकरीता कंत्राटदार यांना देय मोबदला हा एक महिन्यांच्या कालावधी संपल्यानंतर देण्यात येईल. काही अथवा अपरिहार्य कारणास्तव मोबदला देण्यास उशिर झाल्यास सदर रकमेवर व्याज देय राहणार नाही. तसेच देण्यात येणा–या मोबदल्यावर जी. एस. टी. भरण्याची जबाबदारी सर्वस्वी कंत्राटदार यांची राहील.
9. कामगारांच्या कामाच्या वेळा कंत्राटदार हे कार्यालयाच्या गरजेनुसार ठरवतील. तसेच सुट्टीच्या दिवशी देखील गरज भासल्यास कामगारांना काम करावे लागेल. कंत्राटदारांचे वतीने नेमण्यात आलेल्या सर्व कामगारांना एकाच रंगाच्या गणवेशात व ओळखपत्रासहीत हजर रहावे लागेल.
10. इमारतीच्या साफसफाई करीता लागणा–या आवश्यक वस्तु / साधनसामुग्री, साफसफाईचे यंत्र याबाबतच्या खर्चाची जबाबदारी कंत्राटदारावर राहणार आहे. कंत्राटदार यांना दररोज साफसफाई कामाकरीता लागणारे साहित्य ठेवण्यासाठी जिल्हा न्यायालय, नंदुरबार व तालुका न्यायालये येथे आवश्यक जागा उपलब्धतेनुसार उपलब्ध करुन दिली जाईल.
11. कंत्राटदार मार्फत नियुक्त करण्यात आलेल्या सर्व कंत्राटी कामगारांना कामाचे वेतन व त्यानुशंगीक इतर भत्ते रोख स्वरुपात अदा न करता संबंधीत कंत्राटी कामगारांच्या नावाने Account Payee Cross cheque द्वारेच (रेखांकित धनादेशाद्वारेच) कंत्राटदार अदा करतील किंवा इ.सी.एस.द्वारे/एन.ई.एफ.टी./सी.एम.पी. द्वारे त्यांचे बँक खात्यात जमा करावेत व सदर स्टेटमेंट सादर केल्यानंतरच सदर महिन्याचे बील / देयक अदा करण्यात येईल.
12. कंत्राटदाराने त्यांच्यामार्फत नियुक्त करण्यात आलेल्या सर्व कंत्राटी कामगारांना दिलेल्या

वेतनाच्या / इतर भत्यांच्या धनादेशाची (चेकची) छायांकित प्रत, किंवा इ.सी.एस.द्वारे/एन.ई.एफ.टी./सी.एम.पी. द्वारे वेतनाची रक्कम / इतर भत्यांची रक्कम कंत्राटी कामगारांच्या खात्यात जमा केल्याचे दर्शविणारे बँक अधिका-यांचे सहीचे विवरणपत्र (Statement) किंवा कंत्राटी कामगाराची स्वाक्षरी असलेले वेतन देयक (ज्यावर सदर धनादेश क्रमांक / इ.सी.एस.क्रमांक / एन.ई.एफ.टी./सी.एम.पी. क्रमांक लिहीलेला असेल) हे कंत्राटदाराने दरमहा संबंधीत कार्यालयास सादर करावे. जोपर्यंत कंत्राटदार वरील कागदपत्रे संबंधीत कार्यालयास सादर करणार नाहीत तोपर्यंत त्या महिन्यांचे कंत्राटदाराचे देयक अदा केले जाणार नाहीत.

13. दुस-या व चौथ्या शनिवारी (कार्यालय बंद असेल त्या दिवशी) कामगारांना कामावर बोलविण्यात आले नसल्यास त्यांचे वेतन कापण्यात येवू नये. तसेच दुस-या व चौथ्या शनिवारी (कार्यालय बंद असेल त्या दिवशी) कामगारांना काम करण्यासाठी कार्यालयात बोलविण्यात आले तर त्यांना कार्यालयात येणे बंधनकारक राहील व त्यासाठी त्यांना वेगळा माबदला देय होणार नाही. किमान वेतन कायद्यातील तरतूदीनुसार कंत्राटी कामगाराला प्रत्येक आठवडयामध्ये एक (रविवारी) पगारी सुट्टी देणे कंत्राटदारास बंधनकारक राहणार आहे.
14. सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी कामगारांना कामावर बोलविण्यात आले नसल्यास त्याचे त्या दिवसाचे वेतन कापून घेण्यात येवू नये. तथापी सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी कामगारांना काम करण्यासाठी कार्यालयात बोलविण्यात आले तर त्यांना कार्यालयात येणे बंधनकारक राहील व त्याऐवजी त्या कंत्राटी कामगारास बदली रजा अथवा किमान वेतन अधिनियम व कामगार कायद्यानुसार देय असलेले त्या दिवसाचे वेतन यापैकी कोणताही एक पर्याय निवडता येईल. कामगाराच्या बदली रजेच्या / गैरहजेरीच्या दिवशी दुसरा कामगार उपलब्ध करुन देण्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची असेल व उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कामगारांसाठी किमान वेतन कायदा व कामगार कायद्यातील तरतुदी नुसार योग्य ते वेतन संबंधीत कार्यालयाकडून अदा करण्यांत येईल.
15. शासकिय वेळेनंतर कंत्राटी कामगारांना जास्तीचे शासकीय काम करावे लागल्यास त्यांना अतिकालीक भत्ता (ओव्हरटाईम) देणे कंत्राटदारास बंधनकारक असेल व सदर अतिकालीक भत्ता देण्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदारावर असेल.
16. कंत्राटदार यांना देण्यात आलेल्या कंत्राटी सेवेबद्दल ते किंवा त्यांचे वतीने नेमण्यात आलेल्या कंत्राटी यांना या कार्यालयाकडे कायमस्वरुपी नियुक्ती करीता हक्क मागण्याचा अधिकार राहणार नाही.

17. कंत्राटदारार हे कार्यालयात काम करतांना त्यांचे नजरेस ज्या काही बाबी येतील त्या कार्यालयीन बाबी आहेत. याची जाणीव ठेवून त्यासंबंधात आवश्यक ती गोपनियता ठेवतील. तसेच न्यायालयीन कामकाजात कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप होणार नाही याबाबतची दक्षता घेतील. कार्यालयीन गोपनियतेचा भंग झाल्यास सदरचा करार अंशत: अथवा पुर्णता रद्द करण्यात येईल.
18. कंत्राटी कामगारांकडून दररोज वक्तशीरपणे व नियमीतपणे, कार्यालयातील कामे करुन घेण्याची जबाबदारी कंत्राटदाराची असणार आहे. कामगारांची कार्यालयातील वर्तणुक व कामाची गुणवत्ता उच्च दर्जाची राहील व त्यांचे उत्तरदायीत्व हे कार्यालयाच्या सर्व हितसंबंधाचे रक्षण करणेच राहील. तसेच कंत्राटदाराचे वतीने नेमण्यात आलेल्या कंत्राटी कामगारांकडून वक्तशिरपणे व नियमितपणा आवश्यक असुन, त्याचे मुळे कार्यालयास उपद्रव होणार नाही याची काळजी कंत्राटदाराने घेवून, त्यांचेकडून काम करुन घेतील तसेच कामगार अयोग्य व अपात्र असल्याचे अथवा त्यांचे अशोभोनीय गैरवर्तन असल्याचे आढळल्यास त्या कामगारास काढून टाकणे संबंधीचे आदेश देण्याचे अधिकार या कार्यालयास राहतील.
19. कंत्राटदाराने नेमलेल्या कामगारास काम करतांना कोणतीही इजा, अपघात अथवा मनुष्यहानी झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहील. त्यास हे कार्यालय कोणत्याही प्रकारे जबाबदार असणार नाहीत.
20. कंत्राटासंबंधी कोणताही विवाद निर्माण झाल्यास, कार्यालय नेमतील ते न्यायाधीश लवाद म्हणून काम पाहतील व १९९६ च्या लवादाच्या कायद्यानुसार या विवादाबाबत त्यांचे निर्णय अंतिम असेल.
21. कंत्राटदाराने नेमलेल्या कंत्राटी कामगारांकडून सरकारी मालमत्तेचे नुकसान झाले असल्याचे कार्यालयाचे निदर्शनास आल्यास, कंत्राटदारास देण्यात येणा–या मोबदल्यातुन नुकसान भरपाईची रक्कम वसुल करण्यांत येईल.
22. कंत्राटदाराने नेमलेले कामगार व या कार्यालयामध्ये मालक व कर्मचारी असे संबंध राहणार नाहीत. पेमेंट ऑफ वेजेस ॲक्ट १९३६, एम्लॉई प्राव्हीडंट फंड ॲक्ट, पेमेंट ऑफ ग्रच्युईटी ॲक्ट–१९७२, वक्समन कॉपेनसेशन ॲक्ट, वर्कस कॉन्ट्रक्ट लेबर (Prohibition & Regulation) ॲक्ट १९८६ या व सर्व कामगार कायद्यायाच्या तरतुदींचे पालन करण्याची जबाबदारी कंत्राटदारांची राहील. तसेच सदरच्या उपरोक्त कायद्याच्या तरतुदींचे पालन करण्यांची जबाबदारी कंत्राटदाराची राहील. तसेच सदरच्या उपरोक्त कायद्याच्या परिणामांची जबाबदारी कंत्राटदारावर राहील. सदरचे काम

करण्यासाठी कायद्यानुसार लागणारे सर्व परवाने घेण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

23. कंत्राटदारास अदा करावयाचे देयक प्रत्येक महिन्याच्या पाच तारखेपर्यंत प्रत्येक तालुका आस्थापनेवरील साफसफाईचे काम योग्य रितीने आणि बरोबर केले असल्याबाबतचे न्यायिक अधिकारी यांच्या सहीचे प्रमाणपत्र, जिल्हा न्यायालय, नंदुरबार येथे जमा केल्यावरच अदा करण्यात येईल.
24. जिल्हा न्यायालय, नंदुरबार व स्वतंत्र आस्थापना असलेल्या तालुका न्यायालयात सर्व प्रकारची कामे कंत्राटी पध्दतीने करुन घेतल्याबाबतची मासिक अहवाल असमाधानकारक असल्यास कंत्राटदारास देण्यात येणा–या मोबदल्यातुन मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, नंदुरबार हे ठरवतील त्याप्रमाणे रक्कम वजावट करण्यात येईल.
25. कंत्राटदार यांना एकूण कंत्राटाच्या रक्कमेच्या ३ टक्के रक्कम मुदत ठेव जमा द्वारे किंवा बँक गॅरंटीद्वारे दोन वर्षाकरीता सुरक्षा ठेव म्हणून द्यावी लागेल. तसेच त्यांनी कराराच्या कोणत्यासाही अटी व शर्तींचा भंग केल्यास, मुदत ठेव / बँक गॅरंटीची रक्कम जप्त करण्याचा हक्क कार्यालयास राहील. सेवाकराराच्या दरम्यान कंत्राटदाराची सेवा असमाधानकारक आढळुन आल्यास सदर करार नोटीस देवून रद्द करण्यांत येईल आणि सदरचे काम इतर दुस–या एजन्सीकडून कंत्राटदाराच्या जबाबदारीवर व त्याच्या खर्चाने दुसरी व्यवस्था होईपर्यंत करुन घेतले जाईल.
26. कंत्राटदार यांनी कंत्राटी दरम्यानच्या काळात वरील अटी व शर्तींचे पालन करील असे हमीपत्र लिहुन द्यावे लागेल.
27. एखाटया कंत्राटी कर्मचा–याचे काम हे असमाधानकारक वाटल्यास त्याच्या ऐवजी दुसरा कर्मचारी बदलुन देणे हे कंत्राटदारास बंधनकारक राहील.
28. कंत्राटी कर्मचा–यांना वेतन हे मिनीमम वेजेस ॲक्ट नुसार देणे कंत्राटदारास बंधकनकारक राहील.
29. सदर निविदा प्रक्रियेत कोणत्याही प्रकारचा वाद निर्माण झाल्यास त्यासंबंधी समितीचा निर्णय हा अंतिम राहील.
30. कंत्राटी कालावधीमध्ये कोणताही प्रश्न उद्भवल्यास त्याबाबत मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, नंदुरबार यांचा निर्णय अंतिम राहील.

विभाग –४

अ – निविदेच्या सर्वसाधारण अटी व शर्ती :–

1. **ई–निविदा दोन लिफाफा पध्दत :– तांत्रिक लिफाफा** (Technical Bid) व **आर्थिक लिफाफा** (Financial Bid) या पध्दतीने मागविण्यात येत आहे.
2. **निविदा फार्ॅम शुल्क :–** निविदा फार्ॅमची किंमत रक्कम रु.१५०००/– ना–परतावा राहील. निविदा फार्ॅम **ऑनलाईन** पध्दतीने स्वीकारण्यात येईल.
3. **बयाणा रक्कम :–** निविदा धारकाने बयाना रक्कम रुपये १५००००/– (अक्षरी रुपये – एक लाख पंन्नास हजार मात्र) ऑनलाईन पध्दतीने स्वीकारण्यात येईल. बयाणा रक्कम भरण्यापासून सुट देण्यात आलेली असल्यास त्याबाबतचे नजीकच्या काळातील सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र जोडावे.
4. **सुरक्षा ठेव / अनामन रक्क्म :–** ज्या निविदाधारकांची निविदा मान्य करण्यात आली आहे. त्या निविदाधारकास निविदा रक्कमेच्या ३ टक्के रक्कमेचे बँक हमी पत्र १५ दिवसात द्यावे लागेल.
5. **अनुभव प्रमाणपत्र :–** निविदा सादर करण्यासाठी इतर शासकीय कार्यालये अथवा संस्थेमध्ये कंत्राटी कामगारांना साफसफाई करुन घेतलेल्या कामाचा अनुभव असल्यास केलेल्या कामाचे अनुभवाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
6. कोणत्याही स्तरावर ई–निविदा पुर्णत: अगर अंशत: स्वीकारणे / नाकारणे याबाबतचे सर्व अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, नंदुरबार यांचे अध्यक्षते खालील समितीने राखून ठेवलेले आहेत.
7. शासन निर्णय पदनि २५१२/प्र.क्र.१५७/कार्या–१२, दि.२७ जानेवारी २०१५, दि.०२ ऑगस्ट २०१६, आणि २३ फेब्रुवारी २०१७ यामधील निर्देशानुसार तसेच उद्याेग उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. भाखसं–२०२४/प्र.क्र.८२ भाग १११ दिनांक ०१/१२/२०१६ चे नियम पुस्तीके मधील निर्देशानुसार आणि शासनाकडून वेळोवेळी आलेल्या सूचनांचे काटेकोर पालन करणे बंधनकारक आहे.

–––––x–––––

जिल्हा व सत्र न्यायालय, नंदुरबार

ब. निविदा लिफाफामध्ये सादर करावयाची कागदपत्रे –

लिफाफा क्रमांक १ तांत्रिक लिफाफा (Technical Bid)

निविदाधारकांनी ई–निविदेतील तांत्रिक लिफाफ्यामध्ये खालीलप्रमाणे आवश्यक सर्व कागदपत्रे अपलोड करणे आवश्यक आहे.

अ.क्र.	तपशिल		
१	ई–निविदा कंत्राकदाराचे / संस्थेचे / कंपनीचे नांव		
२	निविदाधारकाने निविदा शुल्क व बयाणा रक्कम ऑनलाईन अदा केलेल्या पावतीची प्रत.		
३	ई–निविदाधारकाने स्वत:वर कोणताही गुन्हा दाखल नसल्याबाबतचे तसेच त्याच्या संदर्भात कोणतेही प्रकरण न्ययालयात प्रलंबित नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र दाखल करावे व संस्था चालकाने अद्यावत पोलीस चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र. सदर चरित्र पडताळणी दाखला सन २०२६ चा असणे आवश्यक आहे.		
४	ई–निविदाधारकाने खालील बाबींची पूर्तता केली काय ?		
	१	बयाना/अनामत रक्कम भरलेली आहे काय ?	
	२	कंपनी/संस्थेचे आस्थापना व दुकाने अधिनियमानुसार नोंदणी केलेल्या परवान्याची नोंदणीकृत प्रमाणपत्राची छायांकित प्रत.	
	३	कंपनी/संस्थेचे सेवाकरांच्या / जीएस/सेवा कर/ विक्रीकर भरणा करण्यात आलेला असल्याचे (Tax Clearance) प्रमाणपत्र, प्रमाणपत्राची छायांकित प्रत.	
	४	निविदाधारकाने मागील ३ वर्षाचे आयकर विवरणपत्रे तसेच प्रत्येक वर्षाची उलाढाल रक्कम रु. १००,००,०००/– (अक्षरी रक्कम रुपये एक कोटी मात्र) किंवा त्यापेक्षा जास्त असलेबाबतचे चार्टर्ड अकाउंटंट यांचेकडून प्रमाणित केलेले प्रमाणपत्र जोडणे आवश्यक.	
	५	कंपनी/संस्थेने इ.एस.आय.सी. प्रमाणपत्र	
	६	कंपनी/संस्थेचे पी.एफ. प्रमाणपत्र	
	७	कंपनी/संस्थेचे पॅनकार्डची छायांकित प्रत	
	८	सहकारी संस्था असल्यास ठरावाची प्रत/ संस्थंना निविदा भरावयाची असल्यास जिल्हा व सत्र न्यायालय, नंदुरबार यांचे नावाने अनुमतीपत्र जोडणे आवश्यक आहे.	
	९	शासकीय / निमशासकीय संस्थेत स्वच्छता सेवेचे कमीत कमी पन्नास लाख व त्यापेक्षा जास्तीचे काम केलेबाबतचे अनुभव प्रमाणपत्र / कार्यादेशाची प्रत जोडणे आवश्यक आहे. फक्त प्रमाणपत्र जोडणी केलेल्या कंपनी/संस्था निविदा भरण्यास पात्र राहतील.	

	१०	निविदाधारकाचे काळ्या यादीत नाव नसल्याचे व निविदेतील अटी व शर्ती मान्य असले बाबतचे हमीपत्र रुपये १००/- चे बॉण्ड पेपर वर स्वप्रमाणित करणे आवश्यक आहे.	

उपरोक्त नमुद असलेले अ.क्र. ०४ मधील अ.क्र. ०१ ते १० प्रमाणे कागदपत्रे तांत्रिक लिफाफ्यात सादर केलेले असतील अशाच संस्थांचे दरपत्रक उघडण्यात येतील. अपुर्ण कागदपत्रे असलेल्या कंपनी / संस्थांची निविदा अपात्र ठरविण्यात येतील.

क. निविदा पूर्व बैठक :- निविदेतील अटी व शर्तीबाबत शंका निरसनाकरिता दिनांक २०/०२/२०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता मा.जिल्हा व सत्र न्यायालय, नंदुरबार येथे निविदा पूर्व बैठक राहील.

ड. तांत्रिक लिफाफा (Technical Bid) :-

तांत्रिक लिफाफा उघडते वेळी निविदाधारक यांनी स्वत: अथवा आपल्या प्राधिकृत प्रतिनिधी सोबत (अधिकारपत्रासह) जिल्हा व सत्र न्यायालय, नंदुरबार येथे हजर असणे आवश्यक आहे. तसेच तांत्रिक लिफाफ्या सोबत अपलोड केलेले मुळ कागदपत्रे (Original) व त्यांचे स्वप्रमाणित छायांकित प्रती पडताळणी करता सादर करणे बंधनकारक आहे. पडताळणीच्या वेळी निविदाधारकांनी मुळ कागदपत्र तपासणीसाठी सादर न केल्यास अथवा अपूर्ण कागदपत्र सादर केल्यास किंवा अपलाेड केलेल्या प्रती आणि मुळ कागदपत्रांमध्ये फरक आढळल्यास त्यांनी सादर केलेली निविदा अवैध ठरविण्यात येतील. तांत्रिक लिफाफ्यामध्ये सादर केलेल्या कागदपत्रांची तपासणी केल्यानंतर निविदेची वैधता (पात्र/अपात्र) ठरविणेत येतील. यामध्ये पात्र ठरविणेत आलेल्या निविदाधारकांचेच व्यापारी/आर्थिक लिफाफा उघडण्यात येतील.

इ. आर्थिक लिफाफा (Financial Bid) क्रमांक २ :-

1. निविदाधारकांनी सदर लिफाफा http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ई-निविदेतील BOQ मध्ये विहित नमुन्यातच सादर करणे आवश्यक आहे.
2. तांत्रिक लिफाफ्यात पात्र झालेल्या निविदाधारकांनी व्यापारी / आर्थिक लिफाफा उघडणेचा दिनांक व वेळ कळविण्यात येईल याची निविदाधारकांनी नोंद घ्यावी.
3. तांत्रिक कारणामुळे ई-निविदा प्रक्रियेतील वेळापत्रकात बदल केला जावू शकतो. त्याबाबत सुचना कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर तसेच संकेतस्थळावर वेळोवेळी प्रदर्शित केल्या जातील.

-----X-----

विभाग –५

निविदा वेळापत्रक

सदर निविदा https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द होईल व खाली दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे उपलब्ध राहील.

अ.क्र.	तपशिल	दिनांक	वेळ
१	ई निविदा प्रसिध्दी	१६/०२/२०२६	सकाळी १०.०० वाजता
२	ई निविदा विक्री व सादर करणेस सुरुवात दिनांक	१६/०२/२०२६	सकाळी १०.०० वाजता
३	निविदा पूर्व बैठक	२०/०२/२०२६	सकाळी १०.३० वाजता
४	ई निविदा सादर करणेचा अंतिम दिनांक	०२/०३/२०२६	सायं. ५.०० वाजेपावे
५	तांत्रिक निविदा उघडण्याचा दिनांक	०४/०३/२०२६	सायं. ५.४५ वाजता
६	आर्थिक निविदा उघडण्याचा दिनांक	तांत्रिक लिफाफ्यात पात्र झालेल्या निविदाधारकांना व्यापारी / आर्थिक लिफाफा उघडणेचा दिनांक व वेळ कळविण्यात येईल.	

विभाग – ५ (अ) आर्थिक निविदा

जिल्हा व सत्र न्यायालय, नंदुरबार

प्रपत्र –१

कामाचे नांव	**जिल्हा व सत्र न्यायालय, नंदुरबार येथील मुख्य इमारत, इमारतीचा तळमजला, पहिला मजला, दुसरा मजला, तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरण कार्यालयाची संपूर्ण इमारतीमधील अंतर्गत व बाहय परिसराची साफसफाई. तसेच जिल्हा व सत्र न्यायालय, नंदुरबार यांचे अधिपत्याखालील तालुका न्यायालयातील अंतर्गत व बाहय परिसराची साफसफाई करिता कंत्राटदार यांनी साफसफाईचे काम, मानवी पध्दतीने साधनसामुग्री सहीत सेवा उपलब्ध करणे.**
ई निविदा क्रमांक	
कंत्राटदाराच्या संस्थेचे / कंपनीचे नांव	
कंत्राटदाराच्या संस्थेचा / कंपनीचा संपूर्ण पत्ता	
कंत्राटदाराच्या संस्थेचा / कंपनीचा सेवा कर क्र./ जी.एस.टी. नाेंदणी क्र.	

प्रपत्र –१ कामाचे स्वरुप

अ.क्र.	न्यायालयाचे नांव	न्यायालयीन इमारत आणि न्यायालय आवाराचे क्षेत्रफळ (चौ.मीटर)	कंत्राटदाराने मागणी केली एकूण रक्कम (वार्षिक खर्च)	साधन सामुग्री खर्च (वार्षिक खर्च)	जी.एस.टी. (वार्षिक खर्च)	एकूण रक्कम (रुपये) (४+५+६)
१	२	३	४	५	६	७
१	जिल्हा व सत्र न्यायालय, नंदुरबार	इमारत – ९६२४.८४ चौ.मि.				
		आवार– १२११०.८७ चौ.मि.				
२	जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नंदुरबार	इमारत– ३१८.०६ चौ.मि.				
		आवार– २१७५.०५ चौ.मि.				
३	दिवाणी न्यायालय क.स्तर, नवापूर	इमारत– ४६.५८ चौ.मि.				
		आवार– ३४६३.९२ चौ.मि.				
४	दिवाणी न्यायालय क. स्तर, तळोदा	इमारत– ३६५.५४ चौ.मि.				
		आवार– ४६९४.७१ चौ.मि.				
५	अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय, शहादा	इमारत–१६३६.४८ चौ.मि.				
		आवार– ५४५१.१० चौ.मि.				
६	दिवाणी न्यायालय क.स्तर,	इमारत– २४३.६६ चौ.मि.				

	धडगांव	आवार – ८७६.३४ चौ.मि.				
७	दिवाणी न्यायालय क. स्तर अक्कलकुवा	इमारत– २०२५.९० चौ.मि.				
		आवार– १७७६४.८४ चौ.मि.				

निविदेची दोन वर्षासाठी होणारी एकूण रक्कम रु./–

(अक्षरी रुपये – .....)

(कंत्राटदाराचे नांव, सही, शिक्का दिनांकासह)

अ) स्तंभ क्र. ४ ते ७ मधील माहिती कंत्राटदारांनी भरावयाची आहे.

टिप – कंत्राटदार संस्था / कंपनी यांनी कंत्राटी सेवा उपलब्ध करुन देतांना, उद्याोग उर्जा व कामागार विभाग, शासन निर्ण क्र. भाखसं–२०१४/प्र.क्र.८२ भाग १११ दिनांक ०१/१२/२०१६ चे नियम पुस्तीके मधील निर्देशानुसार आणि शासनाकडून वेळोवेळी आलेल्या सूचनांचे काटेकोर पालन करणे निविदाधारकास बंधनकारक आहे. सदर शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

प्रपत्र – २

कंत्राटदाराकडून मागणी करण्यात आलेला अतिकालीन भत्ता

अ.क्र.	पद	अतिकालीन भत्याची रक्कम (प्रती तास)
१	२	३
१	सफाई कामगार	

(कंत्राटदाराचे नांव, सही, शिक्का दिनांकासह)

अ. स्तंभ क्र. ३ मधील माहिती कंत्राटदारांनी भरावयाची आहे.

ब. प्रपत्र–२ मध्ये कंत्राटदाराचे स्तंभ २ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या पदासाठी प्रती तास किती रक्कमेची मागणी करण्यात येत आहे हे नमुद करावे.

क. कंत्राटदारांनी नमुद केलेल्या वेतनाची रक्कम व अतिकालीक भत्याची रक्कम किमान वेतन कायद्यातील तरतुदींपेक्षा कमी नसावी.

KINDLY CREATE BOQ FILE IN EXCEL AND UPLOAD SAME IN BOQ (COMMERCIAL SECTION)

विभाग – ६ निविदापूर्व शंका विचारण्यासाठीचा नमुना

Pre-Bio Queries Format :_____

Name of the Supplier :_____

Department Name :_____

Tender Ref. No. :_____

Tender Name :_____

Due Date : / / 2026

Sr. No.	RFP Page No.	RFP Clause No.	Causes Title	Queries / Clarification	Justification by Bidder
१					
२					
३					
४					
५					
६					
७					
८					
९					
१०					

हमीपत्र

मी, श्री. ----------

प्रो.प्रा. ----------

एंटरप्रायजेस, पत्ता ----------, संस्थेचा नोंदणी क्रमांक----------, संस्थेचा दुरध्वणी क्रमांक ----------, याद्वारे असे हमीपत्र लिहून देत आहे की, आपल्या कार्यालयामार्फत जाहिर करण्यात आलेल्या जिल्हा न्यायालय, नंदुरबार येथील व त्यांचे अधिपत्याखालील तालुका न्यायालयाचे क्षेत्रफळानुसार साफसफाईचे काम (साधन सामुग्रीसहीत) शासमान्य कंत्राटदारामार्फत कंत्राटी सेवेने (आउटसोर्सिंगद्वारे) करुन घ्यावयाच्या कामाकरीता दोन वर्ष कालावधीसाठीचा सेवासंविदा करार करणेसाठी कामाची निविदा भरताना निविदा अर्जासोबतचे निविदा सूचनेमध्ये नमूद केलेल्या आपल्या कार्यालयातील कामाची माहीती करुन त्यानुसार निविदा भरली आहे. तसेच मी सदर कामासाठीच्या सर्व अटी शर्तींचे पालन करू.

आपल्या कार्यालयाने सदर सेवासाठी निर्गमित केलेला निर्देशन आमचे कंपनीस बंधनकारक राहतील.

ठिकाण : नंदुरबार **स्वाक्षरी**

दिनांक : / / २०२६ **पुरवठादाराचे नांव व पत्ता**

शिक्क्यासह